# पुस्तिका - 5

## कर्तव्ये पार पाडण्यासाठी निश्चित केलेली प्रमाणके ः-

कर्तव्ये पार पाडण्यासाठी निश्चित केलेली प्रमाणके :-

संनिरीक्षण विभाग

1. प्रयोगशाळा तंत्रज्ञ रक्तनमुन्याच्या 70 काचपट्ट्या प्रत्येक दिवशी तपासणी करणे.

2. संनिरीक्षण निरीक्षक 4 संनिरीक्षण अन्वेषकांच्या कामावर पर्यवेक्षण करणे.

3. संनिरीक्षण अन्वेषक दररोज 250 घरांना भेटी देणे; तसेच महिन्यांतून दोनदा 15000 लोकसंख्येच्या व्याप्तीक्षेत्राची पाहणी करणे.

**शालेय आरोग्य सेवा**

प्रत्येकी 1 वैद्यकीय अधिकारी, 1 कनिष्ठ आरोग्य प्रचारिका, 1 शिपाई अशा 37 वैद्यकीय तपासणीच्यामार्फत महानगरपालिकेतील शालेय विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन रोगाचे प्राथमिक अवस्थेत निदान करणे व उपचार करणे.

वैद्यकीय तपासणी चमू, 1191 प्राथमिक शाळा, 49 माध्यमिक शाळा, 18 मतिमंद मुलांच्या शाळाना भेटी देतात व इयत्ता पहिला, तिसरी, पाचवी, सातवी, नववीच्या सर्व विद्यार्थ्यांची सखोल तपासणी करतात.

अन्न भेसळ प्रतिबंधकाअंतर्गत स्वच्छता
अन्न निरीक्षक - प्रतिमास 12 नमुने

**<u>महापालिका विश्लेषक</u>**

महानगरपालिका प्रयोगशाळा, जी/उत्तर विभाग कार्यालय, दुसरा मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर, मुंबई 400 028 येथे आहे. या प्रयोगशाळेत महानगरपालिकेच्या व अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र यांच्या अन्न सुरक्षा अधिका-यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 ह्या अन्वये गोळा केलेल्या औपचारिक व अनौपचारीक अन्न नमुन्यांचे विश्लेषण केले जाते.

महानगरपालिकेच्या ठरविलेल्या दरानुसार शुल्क घेऊन खाजगी व्यक्ती किंवा संस्था ह्यांनी आणलेल्या अन्न, पाणी, रंग, डिटर्जट इत्यादी नमुन्यांचेही विश्लेषण केले जाते. खाजगी विश्लेषणाच्या दरापेक्षा महानगरपालिकेचे दर हे नागरिकांना परवडणारे असे आहेत. केंद्रीय सीमाशुल्क कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या सिगारेट या नमुन्यांचे विश्लेषण या प्रयोगशाळेत केले जाते. पोलिसांकडुन प्राप्त झालेल्या गुटखा, पानमसाला व सुगंधीत तंबाखूचे विश्लेषण या प्रयोगशाळेत केले जाते.

शालेय पोषण आहाराअंतर्गत मध्यान्ह भोजन अंतर्गत महिला बचतगट आणि खाजगी

संस्था, अशासकिय संघटना, महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून आलेले खिचडीचे नमुने उष्मांक व प्रथिने आणि पोषण मुल्ये यांचे अहवाल या प्रयोगशाळेत तपासले जातात.

प्रत्येक विभागीय कार्यालयातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी ह्यांच्या कर्मचा-यांमार्फत प्रत्येक दिवशी पाण्याचे पाच ते दहा नमुने सुक्ष्मजीव तपासणीसाठी हया प्रयोगशाळेत पाठविले जातात. तपासणी झाल्यानंतर अयोग्य नमुन्यांची माहिती ताबडतोब संबंधित आरोग्य अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी (साथरोग), सहाय्यक अभियंता (गळती विभाग), सहाय्यक अभियंता )गुणवत्ता विभाग), सहाय्यक अभियंता (जलकामे मे )इत्यादींना ई-मेलद्वारे दिली जाते जेणेकरुन त्याकडे लक्ष ठेवून सातत्याने नमुने घेवून नमुना योग्य येईपर्यत त्यांची तपासणी केली जाते. तपासणी केलेल्या नमुन्यांचे संगणकीय अहवाल जलअभियंता, उप जलअभियंता, विभागीय आरोग्य अधिकारी व संबंधित अधिका-यांना दिले जातात.

भांडार नियंत्रक विभागाकडून रंग,धातू, साबण, डिटर्जंट, ब्रश इत्यादी वस्तूंच्या निविदा मागविल्या जातात, त्यांची तपासणी या प्रयोगशाळेत केली जाते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मनकानुसार पाण्याचे नमुने घेण्याच्या तंत्राची वैदयकीय आरोग्य अधिकारी व त्यांच्या कर्मचारीवर्गाला माहिती देण्यासाठी महापालिका प्रयोगशाळा प्रशिक्षण देते. तसेच अन्नभेसळ शोधून कारणे व पाण्याचे पृथःकरण हयावर

अ) डी.पी.एचचे विदयार्थी, ब) मुंबई शहरातील वैद्यकीय महाविदयालयाचे विद्यार्थी,

क) आरोग्य शिक्षणाचे पदविका घेणारे विद्यार्थी, ड) काही रुग्णालयातील परिचारीका,

इ) टी.आय.एस.एस.चे विद्यार्थी हयांना व्याख्यान/प्रात्याक्षिके महापालिका विश्लेषक देतात.
एफ) ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंटचे स्वच्छता निरीक्षक यांना प्रशिक्षण दिले जाते.

**सही/-**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**सार्वजनिक आरोग्य खाते**